Impact Factor – 6.261 | Special Issue - 109 | Feb. 2019 | ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

UGC Approved Journal

Multidisciplinary International E-research Journal

Two Days Interdisciplinary International Conference on

# Role of Social Reformers in Nation Building

Organized by


Pankaj Shaikshanik and Samajik Sanstha's

**Pankaj Kala Mahavidyalaya, Chopda**

( 'B' Grade NAAC Accredited )

Sponsored by

**K.B.C. North Maharashtra University, Jalgaon**



- EDITOR -

**Prin. Dr. Sambhaji N. Desai**

- CHIEF EDITOR -

**Mr. Dhanraj T. Dhangar**

For Details Visit To : www.researchjourney.net

SWATIDHAN PUBLICATIONS

Printed By : PRASHANT PUBLICATIONS, JALGAON

# : C O N T E N T S :

1 **Social Reformer : Swami Isrilaprabhupada** .......... 15
- V. Venugopal (VBG DASA, Tirupati)

2 **राष्ट्रभाषा हिंदी के विकास में मराठी भाषिकों का योगदान** .......... 18
– प्राचार्य डॉ. नाना गायकवाड

3 **महिला स्वातंत्र्य चळवळ : महिला समाजसुधारकांचे योगदान** .......... 21
– प्राचार्य डॉ. प्रकाश जाधव

4 **परभणी जिल्ह्यातील बी. रघुनाथ यांचे साहित्य व हैदराबाद मुक्तीसंग्राम (इ.स. १९१३ ते इ.स. १९५३)** .......... 25
– डॉ. गीतांजली भीमराव बोराडे

5 **समाज प्रबोधनातील दिपस्तंभ** .......... 29
– प्रा.डॉ. कावळे बी.एन.

6 **Role of other fields of humanities in social Reforms (Public Administration)** .......... 31
- Dr. Sunil Himmatrao Patil

7 **Syed Ahmed Khan & Muslim Reform In The 19th Century** .......... 34
- Dr. Zoheb Hasan

8 **Literature And Society** .......... 36
- Dr. Anushri Mahurkar

9 **सरदार रामराव गोपाळराव उर्फ बाबासोहब मिरीकर : व्यक्ती आणि कर्तृत्व** .......... 40
– डॉ. अर्चना टाक

10 **महात्मा जोतीराव फुले यांचे शैक्षणिक कार्य : एक अध्ययन** .......... 43
– प्रा.डॉ. कदम डी.के.

11 **Gandhian Perspective on Community and Education** .......... 46
- Dr. Vijaykumar Tupe
- Dr. Kalpana Jamgade

12 **महाराष्ट्रातील समाजसुधारकांचे राष्ट्र निर्मितीमध्ये योगदान** .......... 50
– प्रा.डॉ. विलास घोडे

13 **राष्ट्र उभारणीमध्ये सावित्रीबाईफुले यांचे शैक्षणिक व सामाजिक योगदान** .......... 55
– डॉ. विठ्ठल भिमराव मातकर

14 **साहित्य आणि समाज** .......... 59
– डॉ. विठ्ठल केदारी

15 **कर्मवीर भाऊराव पाटील यांचे देशाच्या जडणघडणीत योगदान** .......... 61
– डॉ. काशीनाथ सोलनकर

16 **Role of Mahatma Jotirao Phule in Nation Building** .......... 63
- Dnyaneshwar M Bansode

17 **भारतातील बालहक्क चळवळ** .......... 65
– प्रा.डॉ. नंदा पांगुळ

18 **WTO And Its Impact on Indian Agriculture** .......... 69
- Prof. Nanwate N.N.

19 **राजर्षी शाहू महाराज – एक कर्मयोगी** .......... 73
– प्रा. सुनिता विठ्ठलराव भोसले

20 **राजर्षी शाहू महाराज यांचे महाराष्ट्राच्या जडणघडणीतील स्थान** .......... 75
– प्रा.डॉ. राजाराम प्रभाकर गावडे



*Printed by :* PRASHANT PUBLICATIONS

Scanned with CamScanner

ISSN : 2348-7143
February 2019

# राजर्षी शाहू महाराज यांचे महाराष्ट्राच्या जडणघडणीतील स्थान

- प्रा.डॉ. राजाराम प्रभाकर गावडे
सहयोगी प्राध्यापक व मराठी विभाग प्रमुख,
कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय, इंदापूर, जि. पुणे.

**प्रस्तावना :**

छत्रपती शिवरायांनी स्थापन केलेले रयतेचे राज्य १८१८ साली लयास गेले. महाराष्ट्राची वाटचाल इंग्रजांच्या अधिपत्याखाली सुरु झाली. महाराष्ट्राच्या मागासलेपणाचे प्रमुख कारण धर्म आणि वर्ण व्यवस्थेमध्ये सापडते. कारण वर्णव्यवस्थेने बहुजनांना शिक्षणाचा अधिकारच नाकारला. महिला आणि अस्पृश्य यांचे प्रचंड शोषण केले. या पार्श्वभूमीवर महिलांना शिक्षण देण्याचे अतिशय मोठे कार्य म. जोतीराव फुले व सावित्रीबाई फुले यांनी केले. त्याचप्रमाणे राजर्षी शाहू महाराज, विठ्ठलरामजी शिंदे, कर्मवीर भाऊराव पाटील, संत गाडगेबाबा, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, इ. महापुरुषांनी बहुजनांवर लादलेली ही बंधने झुगारून देऊन महाराष्ट्राची वाटचाल, किंबहुना आपल्या देशाची वाटचाल पुरोगामित्वाकडे सुरु केली. हजारो वर्षे अंधःकाराच्या आणि अज्ञानाच्या गर्तेत गुंतून पडलेल्या समाजाला नवा चैतन्याचा दीप दाखविण्याचे प्रयत्न केले. धर्म व्यवस्थेला हादरे देण्याचेही काम केले.

**राजर्षी शाहू महाराज :**

समाजात आज चाललेल्या अनेक चळवळींचा पाया महात्मा फुले यांनी घातला. म. फुले यांचे प्रमाणेच राजर्षी शाहू महाराज यांनीही समाजाला प्रगतीचा मार्ग दाखविला आहे. दलित, शोषित, पिडीत यांच्यासाठी शिक्षणाच्या सोयी उपलब्ध करून दिल्या आहेत. तसेच सर्व जातीच्या मुलांसाठी विविध वसतिगृहांच्या निर्मिती शाहू महाराजांनी केली. त्याचप्रमाणे मागासवर्गीयांसाठी स्वतःच्या कोल्हापूर संस्थानामध्ये १९०२ साली ५० टक्के आरक्षण लागू केले. शाहूमहाराज आपल्या भाषणात म्हणाले की, "आपल्या धर्मात जातिभेदामुळे जो उच्चनीचपणा आलेला आहे, तशा प्रकारचा जन्मजात भेदभाव जगाच्या पाठीवरील दुसऱ्या कोणत्याही धर्मात नाही. या जातिभेदाचे अत्यंत हिडीस स्वरुप जर कोठे असेल, तर इतर जातींकडून तुम्हाला ज्या रितीने वागविण्यात येते त्या रितीत दिसून येते. तुम्ही आमचे बंधु असता, तुम्हाला अस्पृश्य म्हणून लेखून, मांजरे-डुकरे-कुत्रे यांपेक्षाही तुम्हाला नीचपणाने वागविण्यात येते ही किती लज्जेची गोष्ट आहे बरे". शाहू महाराजांच्या या उद्गारावरून हिंदू धर्मामध्ये कुत्रे, मांजर या जनावरांपेक्षाही अस्पृश्यांना कमालीचे नीचपणाचे जीवन जगावे लागत होते. जातिभेदाचे हे अत्यंत हिडीस स्वरुप बदलण्याचा शाहू महाराजांनी प्रयत्न केला. आपल्या अधोगतीचे कारण महाराजांनी शोधून काढले आणि आपल्या राज्याची अधिकार सूत्रे हाती आली तेव्हा आपल्या ऑफिसमध्ये मागासलेल्या जातीचा एकही नोकर दिसत नव्हता म्हणून त्यांचा दर्जा वाढविण्यासाठी मागासलेल्या सर्व जातींच्या लोकांना नोकरी देण्याचे धोरण ठरवावे लागले. त्यासाठीच आरक्षणाची तरतूद केली. त्यांच्या शिक्षणासाठी विशेष शिष्यवृत्तीची योजना महाराजांनी केली.

शाहू महाराजांच्या या कार्याचा आढावा घेताना डॉ. गणपतराव सूर्यवंशी आपले मत नोंदविताना म्हणतात, "करवीरच्या जनतेसाठी महाराजांनी तीन आदर्श ठेवले. पहिला, करवीर नगरीत व संस्थानातही वेषाच्या कोणत्याही प्रकाराला वाव द्यावयाचा नाही. दुसरा, प्रजेला सर्व दृष्ट्या संतोष देणे व पुरुषाइतके स्त्रियांना शिक्षण देणे. तिसरा, पुरुषांच्या बरोबरीने स्त्रियांचा समान हक्क आपल्याला मान्य असल्याचे महाराजांनी मान्य केले आहे. या आदर्शाचा परिणाम स्त्री शिक्षित होण्यास व स्त्रियांची उन्नती होण्याच्या दृष्टीने झाला. ज्या मातेच्या पोटी आपण जन्म घेतो, ती स्त्री शुद्र असू शकत नाही. तसेच स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने, शिक्षण मिळावे. येथे असेही म्हणता येईल की शाहू महाराजांनी दलित, शोषित, स्त्रियांच्यासाठी तसेच शेतकऱ्यांच्या प्रगतीच्या दृष्टिकोनातून शेवटपर्यंत लक्ष घातले. आपल्या संस्थानात पुरुषांच्या बरोबरीने स्त्रियांना शिक्षण देण्यास सुरुवात केली. स्त्री जर समर्थ असेल तर तिच्या पोटी जन्माला येणारी पिढी समर्थ असते म्हणून महाराजांनी राजाराम कॉलेजमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थीनींना फी माफी व शिष्यवृत्तीही चालू केली. ही शिष्यवृत्ती 'श्री राधाबाई आक्कासाहेब महाराज स्कॉलरशीप' व 'श्री नंदकुवर महाराणी भावनगर स्कॉलरशिप' या नावाने होती. या शिष्यवृत्तीचे स्वरुप प्रत्येकी ४० रुपये असे होते व उत्तम वर्तनाबद्दल ४० रुपयांचे बक्षिसही होते. यामागे स्त्री शिक्षणाचा प्रसार एवढेच उद्दिष्ट होते.

शाहू महाराजांनी बहुजन समाजाच्या शिक्षणासाठी खास प्रयत्न केलेले आपणास दिसून येतात. ब्राह्मणेतर वर्ग अज्ञानी असल्यामुळे त्यांची प्रगती झाली नाही. बहुजन समाजात खऱ्या ज्ञानाचा लोप झाल्यामुळे देशाची मोठी हानी झाली होती. जातीवाद वाढल्यामुळे राष्ट्रीय एकी राहिली नव्हती. शिक्षण नसल्यामुळे व्यापार, उद्योग, कलाकौशल्य या सर्वांची अवनती झाली. या अवस्थेतून बहुजन समाजाला तारणारे एकमेव साधन म्हणजे विद्या किंवा शिक्षण आहे. यासाठी महाराज म्हणतात, "विद्यामृताचे झरे त्या त्या जातींना मी दाखवून दिले असल्यामुळे त्यांची प्रगती झपाट्याने होईल." महाराजांचे हे विधान आपणास त्यांची शिक्षण विधायक, राष्ट्रीय एकात्मतेविषयक दूरदृष्टीचे महत्त्व पटवून देते. महाराजांनी शिक्षण विषयक प्रयत्न बहुजन समाजाच्या हितासाठीच केले. म्हणूनच समाजात शैक्षणिक प्रगती झाल्याचेही दिसून येते.

शाहू महाराज हे शिक्षणाकडे जनतेच्या स्वातंत्र्याचे एक हत्यार म्हणून पाहात होते. आपल्या राज्यातील सर्वसामान्य जनता सुशिक्षित व साक्षर कशी होईल आणि सर्व कनिष्ठ जमातींच्या मधून नवशिक्षित लोक उदयाला कसे येतील या प्रश्नाचा विचार महाराज

करीत होते. त्यांच्या डोळ्यासमोर शिक्षण हा सामाजिक क्रांतीचा भाग होता. त्यामुळे स्वाभाविकच प्राथमिक शिक्षणावर त्यांचा भर अधिक होता. दलित आणि बिगरदलित असा अठरापगड जातीचा लोकसमूह ज्ञानगंगेच्या प्रवाहात आणावा ही त्यांची धडपड होती. म्हणून त्यांनी प्राथमिक शिक्षणावर भर दिला. जिथे जागा मिळेल तिथे शाळा काढणे समाजातील सधन वर्गाने उरलेल्यांना शिक्षण कर द्यावा अशी भूमिका घेणे आणि क्रमाने प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत व्हावे या हेतूने प्रयत्न करणे त्यांना भाग पडले. शिक्षण हे परंपरेने समाज व्यवस्थेत ज्यांचे गुलाम झालेल्यांना स्वतंत्र करण्याची प्रक्रिया होती. ही स्वतंत्र होण्याची इच्छा शिक्षणामधूनच निर्माण करता येते. तसेच शिक्षण ही जनतेची अस्मिता प्रज्वलीत करण्याची प्रक्रिया होती. यासाठी ते म्हणत, "शिक्षणाशिवाय कोणत्याही देशाची उन्नती झाली नाही असे इतिहास सांगतो. अज्ञानात बुडून गेलेल्या देशात उत्तम मुत्सद्दी व तत्त्वज्ञ वीर कधीही निपजणार नाहीत म्हणून सक्तीची व मोफत शिक्षणाची हिंदुस्थानला अत्यंत आवश्यकता आहे." राजर्षी शाहू महाराजांनी ब्राह्मणेतर समाजाची मानसिक व बौद्धिक जागृती करण्यासाठी शिक्षण मंदिराचा पाया घातला. त्याच्यावर आपण सुंदर मंदिर उभे केले पाहिजे. जीवनाच्या विविध क्षेत्रात बहुजन समाजाची मुले कशी चमकतील हे पाहिले. आज बहुजन समाजाच्या शिक्षण संस्था महाराष्ट्रात ज्ञानदानाचे कार्य करीत आहेत. त्याचे प्रमुख अधिष्ठान महाराजांनी प्रज्वलीत केलेल्या ज्ञानज्योतीत आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी मातीतून माणसे उभी केली त्याप्रमाणेच राजर्षी शाहू महाराजांनी त्या माणसात दुर्दम्य आत्मविश्वास निर्माण करून आधुनिक जीवनाची त्याला जोड देण्याचे ऐतिहासिक कार्य पार पाडले. हजारो वर्षे मूक राहिलेल्या, दबलेल्या समाजाला महाराजांनी वाणी दिली. त्यांचा आवाज हा पददलित कष्टकरी-शेतकरी जनतेचा बुलंद आवाज होता. त्यासाठी जनहितार्थ राबविण्याचे कार्य शाहू महाराजांनी केले. आयुष्याच्या अखेरच्या क्षणापर्यंत त्यासाठीच ते झटले. आपले राज्य त्यांनी पणाला लावले. शिक्षण प्रसार, धर्मसुधारणा, राजकीय, आर्थिक व औद्योगिक सुधारणा, अस्पृश्योध्दार, अशा सर्व प्र... कार्यात त्यांची हीच दृष्टी होती. त्यालाच प्रबोधनाची दृष्टी म्हणता येईल. ६ मे १९२२ रोजी राजर्षी शाहू महाराजांचे प्राणोत्क्रमण झाले. महर्षी शिंदे यांनी महाराजांच्या बद्दल अतिशय गौरवपूर्ण उद्गार काढले. ते म्हणाले, "शाहूराजा नुसता मराठा नव्हता, ब्राह्मणेतरही नव्हता... नवयुगातील सर्वांग परिपूर्ण राष्ट्रपुरुष होता. तो महाराष्ट्राच्या ... विकासाचा एक मोठा स्वाभाविक तरंग होता.

तर प्रबोधनकार ठाकरे म्हणतात, "पाश्चिमात्य राष्ट्र... समाजाने ख्रिश्चन धर्मात क्रांतिकारक बदल घडवून आणण्याचे कार्य मार्टिन ल्यूथर यांनी केले तेच कार्य महाराष्ट्रात शाहू महाराजांनी केले. यावरूनही म्हणता येईल की शाहू महाराजांनी लोकशाहीचा ... भक्कम केला तसेच ज्ञानाची ज्योत सर्व महाराष्ट्रात पेटवी... अत्यंत महत्त्वपूर्ण कार्य केले. अस्पृश्यतेचा कालिमा दूर करण्याचे काम महाराजांनी केले.

## संदर्भ

१. रमेश वरखेडे (डॉ.) : 'संपादक-प्रबोधनपर वैचारिक ...' यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक, प्रकाशन-२००३, पृष्ठ क्र.११
२. सुब्बराव गणपतराव सूर्यवंशी (डॉ.) : 'राजा शाहू ... समाज प्रबोधन', रणजित प्रकाशन, इचलकरंजी, ... आवृत्ती, १९९८ (पृ.क्र.२३९)
३. तत्रैव पृ.क्र. ४८.
४. तत्रैव पृ.क्र. ५०.
५. तत्रैव पृ.क्र. २६८.
६. तत्रैव पृ.क्र. २६९.
७. बा.ग. पवार : 'महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांचे ...' मातृभूमी प्रकाशन, पुणे, चतुर्थ आवृत्ती, २०००.



Scanned with CamScanner